२०११०५१०१६३४४३००१

सन २०१०-२०११ आर्थिक वर्षात
जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत पुणे, नागपूर,नांदेड-वाघाळा, कल्याण-डोंबिवली, नवी मुंबई, मिरा भाईंदर,नाशिक व ठाणे महानगरपालिका यांना राज्य हिश्श्याचा निधी वितरित करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्र.एनयुआर-२०११/प्रक्र-१२६/नवि-३३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ३१ मार्च, २०११

संदर्भ : १) केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाचे आदेश क्र. एफ-५९ (१)/पीएफ-१/२०१०-१३१२, दिनांक २४ फेब्रुवारी २०११
२) केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाचे आदेश क्र. एफ-५९ (१)/पीएफ-१/२००९-३४, दिनांक २५ मे, २००९
३) शासन निर्णय क्र. एमयुआरएम-२००७/३५६/प्र.क्र.७२/०७/नवि-३३, दिनांक १६ जुलै, २००७

प्रस्तावना : नागरीकरणाचा वाढता वेग व व्याप्ती विचारात घेवून केंद्र शासनाने देशातील ६३ शहरांमध्ये पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी "जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुर्ननिर्माण अभियान" हा महत्वाकांक्षी कार्यक्रम दिनांक ३ डिसेंबर,२००५ रोजी जाहीर केला आहे.

उक्त कार्यक्रमाअंतर्गत पुणे, नागपूर,नांदेड-वाघाळा, कल्याण-डोंबिवली, नाशिक, नवी मुंबई,मिरा भाईंदर व ठाणे महानगरपालिकांच्या मंजूर शहर विकास आराखडयासंबंधातील सविस्तर प्रकल्प अहवाल हे राज्यस्तरीय सुकाणू समितीच्या मान्यतेने केंद्र शासनाच्या अंतिम मंजूरीसाठी "नोडल एजन्सी" (MMRDA) मार्फत सादर करण्यात आले होते. त्यास आता, केंद्र शासनाच्या केंद्रीय मंजूरी समिती (Central Sanctioning Committee) ने मंजूरी दिली असून संदर्भाधिन क्र १ येथील केंद्र शासनाच्या आदेशांन्वये ठराविक रक्कम वितरीत करण्यास मान्यता दिली आहे. सदर मंजूरीनुसार JNNURM योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार केंद्र शासनाने वितरीत केलेल्या रक्कमा व त्याप्रमाणात राज्य शासनाच्या प्रमाणशीर हिश्श्याच्या रक्कमा खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आहेत :-

(रुपये लाखात)

अ.क्र.	शहर	प्रकल्प	केंद्र हिस्सा	राज्याचा प्रमाणशिर हिस्सा
१	नाशिक	भुयारी गटार योजना टप्पा-१	१,११३.४५	४४५.३८
२	पुणे	एसटीपी सुधारणा	१,०७६.६३	४२६.०५
३	पुणे	आळंदी रोड	४६२.८८	१८५.१५
४	कल्याण डोंबिवली	पर्जन्य जलवाहिन्या	४८४.७७	२०७.७६
५	कल्याण डोंबिवली	भुयारी गटार	१,४८४.२९	६३६.१३

६	नवी मुंबई	भुयारी गटार	३,०९४.९७	१,३२६.४१
७	नवी मुंबई	पाणीपुरवठा	२,०१७.०५	८६४.४५
	नांदेड	रस्ते विकास टप्पा-१	१,२२१.७१	१५२.७१
	नांदेड	पर्जन्य जलवाहिन्या (उत्तर नांदेड)	९१४.६२	११४.३२
१०	मिरा भाईंदर	भुयारी गटार	२,८९९.९५	१,२४२.८४
११	नागपूर	पाणी लेखापरिक्षण	१८७.५०	७५.००
१२	नागपूर	पाणी साठवणूक टाक्या(पेंच ४ टप्पा-३)	६०४.४२	२४१.७७
१३	नागपूर	हमादुल्ला ते राज्यपाल भवन पाणी वाहतूक व्यवस्था (पेंच४ टप्पा-२)	४६४.७०	१८५.८८
१४	नागपूर	कन्हान प्रकल्प	६१६.२६	२४६.५०
१५	ठाणे	मलनि:स्सारण प्रकल्प टप्पा-३	२१९.५०	८७.८
१६	नाशिक	घनकचरा व्यवस्थापन	१९३.६१	७७.४४
एकूण			१७,०५६.३१	६,५१६.५८

शासन निर्णय :

जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियान अंतर्गत प्रस्तावित नमूद मंजूर प्रकल्पांसाठी राज्य शासनाकडील हिस्सा रुपये ६५,१६,५८,०००/- वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. केंद्र शासनाने आपल्या आदेशात सदर रकमा अंमलबजावणी संस्थेस त्वरीत वितरीत कराव्यात असे नमूद केलेले आहे. **सदर रकमेचे वितरण अनुदान म्हणून करण्यात येत आहे.** त्यानुसार खालील तक्त्यात दर्शविल्यानुसार **रुपये पासष्ट कोटी** सोळा लक्ष , **अठ्ठावन्न हजार फक्त (रुपये ६५,१६,५८,०००/- फक्त) इतका** निधी वितरीत करण्यासाठी मंजूरी देण्यात येत आहे आणि यासाठी श्री.का.तु. सातकर, उपसचिव, नगर विकास विभाग यांना **"नियंत्रण अधिकारी"** म्हणून घोषित करण्यात येत आहे व श्री.अ.रा. राजपूत, कक्ष अधिकारी, नगरविकास विभाग यांना **"आहरण व**

संवितरण अधिकारी" म्हणून घोषित करण्यात येत आहे. त्यांनी **रुपये पासष्ट कोटी सोळा लक्ष , अठ्ठावन्न हजार फक्त (रुपये ६५,१६,५८,०००/- फक्त)** इतक्या रकमेचा धनादेश जेएनएनयुआरएम फंड ("JNNURM Fund") या नावाने काढावा व मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडे (राज्यस्तरीय नोडल एजन्सी) सुपूर्त करावा. राज्यस्तरीय नोडल एजन्सीने सदर रकमांचे वितरण संबंधित महानगरपालिकेस तात्काळ करावे.

(रुपये लाखात)

अ.क्र.	शहर	प्रकल्प	राज्याचा प्रमाणशीर हिस्सा
१	नाशिक	भुयारी गटार योजना टप्पा-१	४४५.३८
२	पुणे	एसटीपी सुधारणा	४२७.०५
३	पुणे	आळंदी रोड	१८५.१५
४	कल्याण डोंबिवली	पर्जन्य जलवाहिन्या	२०७.७६
५	कल्याण डोंबिवली	भुयारी गटार	६३६.१२
६	नवी मुंबई	भुयारी गटार	१,३२६.४१
७	नवी मुंबई	पाणीपुरवठा	८६४.४५
८	नांदेड	रस्ते विकास टप्पा-१	१५२.७१
९	नांदेड	पर्जन्य जलवाहिन्या (उत्तर नांदेड)	११४.३२
१०	मिरा भाईंदर	भुयारी गटार	१,२४२.८४
११	नागपूर	पाणी लेखापरिक्षण	७५.००
१२	नागपूर	पाणी साठवणूक टाक्या(पेंच ४ टप्पा- ३)	२४१.७७
१३	नागपूर	हुमादुल्ला ते राज्यपाल भवन पाणी वाहतूक व्यवस्था (पेंच४ टप्पा-२)	१८५.८८
१४	नागपूर	कन्हान प्रकल्प	२४६.५०
१५	ठाणे	मलनि:स्सारण प्रकल्प टप्पा-३	८७.८
१६	नाशिक	घनकचरा व्यवस्थापन	७७.४४
एकूण			६,५१६.५८

[illegible] पुणे, नागपूर,नांदेड-वाघाळा, कल्याण-डोंबिवली, नाशिक, नवी मुंबई,मिरा भाईंदर व ठाणे महानगरपालिका त्रिपक्षीय करारनाम्यात नमूद केलेल्या सुधारणांबाबत वर्षनिहाय केलेली प्रगती पाहून तसेच वितरित [illegible] अनुदानाचे विनियोग प्रमाणपत्र दिल्यानंतरच सदर योजनेअंतर्गत केंद्र शासन व राज्य शासनाचा पुढील हिस्सा [illegible].

[illegible] केंद्र शासनाकडून प्रत्यक्ष पाहणीद्वारे या योजनेअंतर्गत प्रकल्पाच्या अंमलबजावणीचा तसेच सुधारणा [illegible] प्रगतीचा आढावा घेण्यात येईल. पुणे, नागपूर,नांदेड-वाघाळा, कल्याण-डोंबिवली, नाशिक, नवी मुंबई [illegible] व ठाणे महानगरपालिका दर तीन महिन्यांनी राज्यस्तरीय नोडल एजन्सीमार्फत राज्य तसेच केंद्र शासनाच्या [illegible] अनुदानाच्या विनियोगाबाबतचा अहवाल राज्य शासन तसेच, केंद्र शासनास सादर करावा. अशाप्रकारे [illegible] अहवाल सादर करण्यास विलंब झाल्यास त्यांना पुढील हिस्सा प्रलंबित विनियोग अहवाल प्राप्त होईपर्यन्त [illegible] करण्यात येणार नाही.

[illegible] प्रस्तुत योजनेअंतर्गत सर्व प्रकल्पांची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर या योजनेमधून [illegible] अहवाल संबंधित महानगरपालिकेने/ नगरपालिकेने राज्य शासन व केंद्र शासनास सादर करावा.

[illegible] पुणे, नागपूर,नांदेड-वाघाळा, कल्याण-डोंबिवली, नाशिक, नवी मुंबई,मिरा भाईंदर व ठाणे [illegible] अनुदान म्हणून देण्यात येणा-या **रुपये पासष्ट कोटी सोळा लक्ष , अठ्ठावन्न हजार फक्त (रुपये [illegible] फक्त)** रकमेचा खर्च हा "मागणी क्र.एफ-२, २२१७, नगर विकास, १९१, महानगरपालिकांना [illegible] जवाहरलाल नेहरु राष्ट्रीय नागरी पुनर्निर्माण अभियानांतर्गत महानगरपालिकांसाठी [illegible] सहाय्य (राज्य हिस्सा) (२२१७३२२४), ३१, सहाय्यक अनुदान (वेतनेतर)" या लेखाशिर्षाखाली [illegible] या चालू आर्थिक वर्षी मंजूर तरतुदींमधून भागविण्यात यावा.

[illegible] शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.३८४/११/[illegible], [illegible] निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(रा. वि. कुलकर्णी)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

[illegible]

[illegible] महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१ , मुंबई
[illegible] महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)- २ , मुंबई
[illegible] संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
[illegible] अधिदान व लेखाधिकारी, मुंबई यांना उपयोगिता प्रमाणपत्राच्या प्रतीसह अग्रेषित.
[illegible] प्रधान सचिव, वित्त / प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
[illegible] तथा महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,. मुंबई
[illegible] आयुक्त, संबंधित महानगरपालिका .
[illegible] लेखाशाखा, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
९) सह सचिव (नवि-३३) नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई
[illegible] अवर सचिव (नवि-४) नगर विकास विभाग,मंत्रालय, मुंबई
[illegible] निवडनस्ती (नवि-३३)